# एम्को फाउंडेशनचे परिवर्तन संमेलन



विविध कलाविष्कार सादर करताना विद्यार्थी.

ठाणे : शैक्षणिक विकासाबरोबरच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा या उद्देशाने एम्को फाउंडेशनच्या वतीने होणाऱ्या परिवर्तन प्रकल्पांतर्गत असलेला वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम शुक्रवारी गडकरी रंगायतन येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात नृत्य, नाट्य, एकांकिका, वक्तृत्व अशा विविध कलाविष्कारांच्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश दिला. या स्नेहसंमेलनात ठाणे महापालिकेच्या मराठी आणि उर्दू माध्यमांच्या १३ शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून ग्रोथ सेंटर इंडिया प्रा.लि. एमडी स्वाती साळुंखे, एम्को फाउंडेशनच्या ट्रस्टी मीनाक्षी जैन आणि एम्को फाउंडेशनच्या मॅनेजिंग ट्रस्टी एस. रामस्वामी उपस्थित होते. स्वाती साळुंखे यांनी मुलांना या कार्यक्रमात मोलाचे मार्गदर्शन केले. (प्रतिनिधी)